# आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन
# आणि प्रगती अभियान यांच्या सहयोगाने
# नागली विकास कार्यक्रम २०१९-२१

## सामुदायिक वस्तु केंद्र /सामुदायिक बियाणे केंद्र /सामुदायिक प्रक्रिया केंद्र

### सामुदायिक वस्तु केंद्र

आपण गेल्या दोन वर्षापासुन आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र आणी प्रगती अभियान संस्था, नाशिक यांच्या सहयोगातुन नाशिक,ठाणे पालघर या जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, पेठ सुरगाणा कळवण, शहापुर, मोखाडा या तालुक्यामध्ये नागली विकासाचे कार्य करीत आहोत. नागलीच्या सुधारीत पध्दतीचा अवलंब करुन नागलीच्या उत्पादनात वाढ झालेली आपण पाहत आहोत. या सर्व कामात शेतकऱ्यांकडे शेतीशी निगडीत कोणतीच अवजारे उपलब्ध नाही हे आम्ही पाहत होतो. किड रोगावर नियत्रंणसाठी निम ऑइल दिले पण म्हणुन स्प्रेपंप आणि निंदणी, सुकर व्हावे यासाठी सायकल विडरसारखे अवजारे देण्यात आली. ही अवजारे शेतकरी गट मिळुन दिले आहे. त्या गटानेच त्या अवजाराचा वापर करुन त्याचे व्यवस्थापन ठेवावे. या हेतुने अवजारे केंद्र तयार केली आहे.






### सामुदायिक बियाणे केंद्र






नागलीच्या विविध स्थानिक जाती लोप पावत चालल्या आहे त्यांच जतन सवंर्धन व्हावे हा विचार समोर ठेवुन निवडक गावात स्थानिक स्तरावर बियाणे केंद्राची स्थापना केली आहे. शेतकरी गटाच्या माध्यमांतुन नागली प्रयोगातील शेतकऱ्यांसाठी ही बियाणे केंद्र कार्यरत आहे. निर्जतुक केलेले, मोठे टपोरे एक सारखे बिज, हळी, गरी,निमगरवी जातीचे बीयाणे या केंद्रात आहे. आपल्याच भागातील शेतकऱ्यांना वेळेवर बियाण मिळावे, हा हेतु समोर ठेवुन आणी कोणतीही रक्कम न देता आदान प्रदान च्या सहयोगातुन हे केंद्र उभी केली आहे. बियाणे उत्तम तर पिकही भरदार येते. नागली शिवाय इतर जातीच्या बियांनाचे देखिल संवर्धन या केंद्रात केले जाणार आहे.

### सामुदायिक प्रक्रिया केंद्र

निवड केलेल्या आदिवासी भागात नागली कापणी झाल्यावर ती मळणीसाठी खुप तसदी करावे लागते बैल जोडीच्या सह्यायाने खळ्यावर कुटुबातील सर्व सदस्यांना या मळणीसाठी अनेक दिवस वेळ द्यावा लागतो. ह्या पारंपारीक पध्दतीने नागली मळणी करणे हे खुप कष्टदायक कामे आहे. विशेषत महिलांना या कामासाठी जास्त कष्ट करावे लागतात. म्हणुन संस्थेने मळणी यंत्र काही शेतकरी गट मिळुन दिलेले आहे. ह्या मळणी यंत्राच्या सहाय्याने मळणीचे काम सोपे होत आहे.




